


# https://bnpflexbanners.com/

प्रणाली मध्ये अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना..

Version 1.0.0

## नवीन अजर्दार नोंदणीसाठी पुढील प्रमाणे कार्यवाही करावी

१) प्रथम **अर्जदार नोंदणी** या ऑप्शन वरती क्लिक करावे.

२) या अगोदर प्रणाली मध्ये नोंदणी केली असल्यास मोबाईल क्रमांक व पासवर्ड टाकून लॉगीन करावे.

३) प्रथम नोंदणी करण्यासाठी "**नवीन युजर? येथे क्लिक करा**" या ऑप्शन वरती क्लिक करावे.

४) त्यानंतर अर्जदाराचे नांव/आधार क्रमांक/ई-मेल/मोबाईल क्रमांक व लॉगीन करण्यासाठी पासवर्ड भरावा

५) त्यानंतर "**OTP पाठवा**" या बटणावर क्लिक करावे. मोबाईल वरती आलेला OTP भरावा व त्यानंतर जतन करा या बटणावर क्लिक करावे.

६) माहिती सबमिट झालेल्या नतंर पुन्हा मोबाईल क्रमांक व पासवर्ड भरून लॉगीन करावे.

## अर्ज करण्यासाठी खालील सुचेनेप्रमाणे अर्ज करावा

१) नवीन परवाना नोंदणी साठी "नवीन बॅनर / होर्डिंग परवानासाठी अर्ज करा" या ऑप्शन वरती क्लिक करावे.

२) प्रथम अभिकरणाचे नाव (बॅनर / होर्डिंग छापणाऱ्या व्यक्तीचे नाव for eg. xyz Arts) यादी मधून सिलेक्ट करावे. जर यादीमध्ये नांव नसल्यास इतर ऑप्शन सिलेक्ट करून पुढे संबंधित अभिकरणाचे नाव नमूद करावे.

३) त्यानंतर बॅनर / होर्डिंग छापणाऱ्या व्यक्तीचा मोबाईल क्रमांक व ई – मेल भरावा.
टीप: ज्या व्यक्तीकडून बॅनर / होर्डिंग छापणार आहात त्याचा ई-मेल अचूक नमूद करावा परवाना मंजूर झाले नंतर त्यांना QR कोड प्रिंट साठी ई-मेल जातो.

४) त्या नंतर होर्डिंग परवानगी प्रकार निवडावा **कायमस्वरूपी** कि **तात्पुरते** हे सिलेक्ट करावे, त्यानंतर होर्डिंग प्रकार निवडावा

५) त्या नंतर कोणत्या तारखेपासून होर्डिंग लावणार आहात ती दिनांक निवडावी.

६) तुम्हाला जो नागरी संदेश द्यायचा आहे, त्या नागरी संदेशाचा प्रवर्ग भरावा.

७) त्यानंतर एकूण किती ठिकाणी होर्डिंग उभे करणार आहे त्या ठिकाण संख्या भरावी.

८) त्या नंतर ठिकाणांची माहिती भरावी, माहिती भरताना प्रथम ठिकाण निवडावे त्यानंतर रुंदी व लांबी चौ.फु. मध्ये भरावी व “समाविष्ट करा” या बटनावर क्लिक करावे. अश्या प्रकारे सर्व ठिकाणांची माहिती भरावी.

९) त्या नंतर पेमेंट माहिती मध्ये ऑफलाईन हा ऑप्शन सिलेक्ट करावा.

१०) बॅनर / होर्डिंग १ व २ अपलोड करावे

११) सर्व माहिती भरल्यानंतर सबमिट करा या बटनावर क्लिक करावे. त्यानंतर “तुमचा अर्ज यशस्वीरित्या सबमीट झाला.” असा संदेश येईल.

१२) परवाना नोंदणी केलेल्या अर्जाचा स्टेटस पाहण्यासाठी “**मान्यतेसाठी प्रलंबित होर्डिंग**“ या ऑप्शन चा वापर करावा.

१३) मंजूर झालेले परवाने पाहण्यासाठी मंजूर होर्डिंग या ऑप्शन वरती क्लिक करून परवाना व QR कोड डाऊनलोड करावा.

## बॅनर / होर्डिंग परवाना नुतनीकरण करण्यासाठी

१) बॅनर / होर्डिंग परवाना नुतनीकरण करण्यासाठी “मुदत संपत आलेले होर्डिंग परवाना” या ऑप्शन वरती क्लिक करावे.

२) नुतनीकरण करा या ऑप्शन वरती क्लिक करावे. पुढील दिनांक कधीपासून हवी ती दिनांक सिलेक्ट करावे व संबंधित करावे

३) नवीन बॅनर / होर्डिंग छायाचित्र प्रत असल्यास अपलोड करावी

४) सर्व माहिती भरल्यानंतर सबमिट करा या बटनावर क्लिक करावे. त्यानंतर “तुमचा अर्ज यशस्वीरित्या सबमीट झाला.” असा संदेश येईल.

